
नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०७/२०२५ (गुरूवार)**

---

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या "IGNITE" ऑनलाईन व्याख्यान मालिकेत Cyber Security Awareness and Digital Safty for Women youth leaders या विषयावर मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान

राष्ट्रीय महिला आयोगाची द्वितीय "IGNITE" ऑनलाईन व्याख्यान मालिका सुरू असुन या उपक्रमाचे उद्दिष्ट महिलांशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा आणि ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे, त्यांच्या समग्र विकास आणि सक्षमीकरणाला चालना देणे आहे. आज दिनांक ३१/०७/२०२५ रोजी दुपारी ०४:०० वाजता सदर व्याख्यान मालीकेत मा श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी Cyber Security Awareness and Digital Safty for Women youth leaders या विषयावर व्याख्यान घेतले. सदर व्याख्यानामध्ये मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, यांनी महिलांना लक्ष्य करणाऱ्या सायबर गुन्ह्यांचे विकसित होत असलेले स्वरूप, ज्यामध्ये ऑनलाइन छळ, फिशिंग, ओळख चोरी आणि वैयक्तिक डेटाचा गैरवापर वैयक्तिक डिजिटल सुरक्षितता, मजबूत पासवर्ड व्यवस्थापन, सुरक्षित ब्राउझिंग आणि जबाबदारीने सोशल मीडियाचा वापर इत्यादी बांबीवर प्रभावी व्याख्यान दिले,तसेच सायबर गुन्हयांपासुन स्वत:ला सुरक्षीत कसे ठेवावे या बाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.


IGNITE
An Online Lecture Series by NCW
Empowering Women & Youth across India through knowledge, dialogue, and inspiration!
Session 2: Digital self defence 101-A session on cyber security awareness and digital safety for women youth leaders.
By IPS, SP Crime Branch Nagpur District and CEO Marvel
Sh. Harssh A. Poddar
Date: 31 July 2025
Time: 4 PM
BE INSPIRED, BE INFORMED. BE EMPOWERED.
/NCWIndia /NCWIndia /NCWIndia /NCWIndia www.ncw.gov.in

# नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे घेण्यात आली पोलीस पाटलांची बैठक

दिनांक ३१/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत पोलीस भवन येथे उपविभाग रामटेक हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत करण्यात आले होते. सदर बैठकीत श्री अनिल म्हस्के , अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नमुद उपविभागातील पोलीस पाटलांची बैठक घेवुन त्यांना आगामी येणाऱ्या जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा, गणेश,चतुर्थी(स्थापणा), अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये आणि आगामी निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन गावात शांतता राखावी. तसेच गावात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्याबाबत, महीला व बालकांच्या सुरक्षेबाबत, गावतील अवैध धंदयावर आळा घालणेबाबत इत्यादी मुद्दयांवर मार्गदर्शन करून सुचना देण्यात आल्या. श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी सुध्दा उपस्थित पोलीस पाटलांना मार्गदर्शन करून सुचना दिल्या. सदर बैठकीस २०० ते २५० पोलीस पाटील हजर होते.





## मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड,१ आरोपी अटक
## बुटीबोरी पोलसांची कामगिरी

**अपराध क्रमांक ६९१/२०२५ :—** फिर्यादी नामे निखील धोंडु राहांगडाले, वय ३२ वर्ष. रा. मसवानी पो. खोडशिवणी ता. सडक अर्जुनी जि.गोंदिया ह.मु. शिव मंदीर समोर सातगांव रिधोरा. ता.हिंगणा जि.नागपूर यांनी तिरूपती वाईन शॉपचे समोर एमआयडीसी चौक बुटीबोरी येथे दि १८/०७/२०२५ चे रात्री २१/०० वा दर आपल्या ताब्यातील बजाज प्लाटीना मोटार सायकल क्रमांक एम.एच.३५ झेड. ४१९४ ही उभी केली असता कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून चोरून नेली आहे. अशा फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पो स्टे बोरी येथे अप क्र ६९१/२५ कलम ३०३(२)बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

बुटीबोरी पोलीसांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास करत गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दतीने तपास करून सदर गुन्हा उघडकीस आणुन साखळी पुरावे जोडुन सदर गुन्हयात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी १.चंद्रकांत उर्फ शेखर शंकर कुटारकर, रा. ,वय २५ गव्हा, ता. समुद्रवर जि. वर्धा याचा मा.न्यायालयातुन ताबा घेवुन सदर गुन्हयात नमुद आरोपीतांना अटक करून

आरोपीच्या ताब्यातुन चोरीस गेलेला मुद्द्देमाल मोटार सायकल क्रमांक एम.एच.३५ झेड. ४१९४ जप्त केली. दिनांक २५/०७/२०२५ रोजी नमुद आरोपीला पोलीस स्टेशन वणी जि. यवतमाळ दाखल अप क्र ५२५/२५ कलम ३०३(२)भा.न्या.सं या गुन्हयात अटक करण्यात आली होती.




## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १७ गुन्हे नोंद एकुण १९,९६०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ३०/०७/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री/वाहतुक करणाऱ्यांवर छापा**

**टाकुन देशी दारू, मोहाफुल गावठी दारू असा एकुण १९,९६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन वेलतुर** येथे १. नमदेव सिध्दु मेश्राम वय ७५ वर्ष,२. नरहरी नामदेव मेश्राम वय ५२ वर्ष दोन्ही रा. पचखेडी ता.कुही यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे मोरेश्वर तिमाजी चांदेकर, वय ५५ वर्ष, रा. नक्षी गोहली पुर्न ता भिवापूर जि नागपूर याचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महादेव किशन चाचेरकर, रा जोगीठानापेठ, उमरेड यांचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १ खुशाल हरीभाउ तांबूलकर ,वय ४५ वर्ष रा. तारसा, २. विवेक भूजाडे ,वय ४२ वर्ष, रा. तारसा, ३. यादोराव हिरामण ठवकर, वय ४० वर्ष, रा. तारसा यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे अमित रामदास बरडे, वय २८ वर्ष, रा नांदोरी, ता,सावनेर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १. हनुमान भोखाराम चौधरी, वय ३७ वर्ष, रा जाप्ती कोरना बाडमेर पंचपदरा, राज्य राजस्थान ह.मु जुनापाणी शिवार, २. जिवन चंद्रशेखर चरडे, वय ३८ वर्ष, रा विकासनगर कोंढाळी आणि ३. मोहम्मद गफार अकबर अंसारी, वय ५६ वर्ष, रा खापरी, बारोकर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बेंला** येथे आरोपी नामे निलेश जवाहरलाल जैस्वाल, वय ३७ वर्षे, रा.बेला वार्ड क्र.२ ता.उमरेड जि.नागपुर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १.राहूल जयपाल भट, वय ३२ वर्ष ,रा. रूईखैरी ता.जि. नागपूर, २.सुरज लिलाधर ठाकरे वय ३१ वर्षे रा. कोलार ता. जि. नागपूर, ३. प्रणय भुमेश्वर चहांदे वय वर्ष रा. प्लॉट नं. ५१२ परदेसीपुरा रोड, गड्डीगोदाम नागपुर, ४. विजु रतीराम ठाकरे वय २९ वर्ष रा. मु. चारगाव पो. ठाणा ता उमरेड जि. नागपुर ह.मु. मरसघाट ता. उमरेड, ५. कृष्णा मारोती पारसे वय ३९ वर्ष रा. दुधाळा सातगांव ता. हिंगणा जि. नागपुर आणि ६. प्रजुत अरूण मानकर वय ४२ वर्ष, रा. आंबेडकर नगर, वार्ड नंबर ६, बुटटीबोरी ता. जि. नागपुर यांचेवर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे मंगेश ईश्वर रंगारी, वय ३६ वर्षे रा सेलडोह जि वर्धा त सेलु, याचेवर गुन्हा नोंद आहे. अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १७ गुन्हे दाखल केले आहे.

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ३१/०७/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ नियोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. पोलीस निरीक्षक श्री सतिश रणजितसिंह राजपुत, पोलीस स्टेशन एमआयडीसी. २. पोउपनि श्री नरेश जयदेवजी रामटेके , नेमणूक पोलीस स्टेशन उमरेड ३. पोउपनि/ श्रीमती निलीमा अतुलराव नलोडे, नेमणूक पोलीस स्टेशन बेला ४. श्रेणी पोउपनि श्री सदाशीव केशवराव काटे, नेमणूक पोलीस स्टेशन वेलतुर ५. श्रेणी पोउपनि/१५७० श्री सुरेश रायबांजी धवराळ नेमणूक पोलीस स्टेशन उमरेड ६. श्रेणी पोउपनि/५२४ श्री जयेंद्र बाबुराव शिर्के , नेमणूक पोलीस स्टेशन खापा ७. सहायक फौजदार श्री विठठल नानाजी वंजारी, नेमणूक पोलीस स्टेशन खापरखेडा, ८. सहायक फौजदार श्री खुशाल वंसत रामटेके, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामीण ९. सहायक फौजदार श्री अनिल गूलाबराव बगमारे, नेमणूक पोलीस स्टेशन पारशिवनी यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, श्री विजय माहुलकर, पोलीस उपधिक्षक,गृह मानव संसाधन शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक श्रीमती जोत्स्ना गिरी व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ३०/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ३१/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत रामटेक टाउन येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि बस स्टॅंड, रामटेक जवळ नाकाबंदी केली. सदर कोबिंग ऑपरेशन श्री रमेश बरकते यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. हॉटेल लॉजेस चेक करण्यात आले. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर

कारवाईमध्ये रामटेक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार यांच्या सोबत दंगा नियंत्रण पथक चे अंमलदार हजर होते.






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने